**<u>ठळक बातम्या</u>**

- भारत आणि न्यूझीलंड यांच्यातला मुक्त व्यापार करार उद्यापासून लागू होणार
- रेल्वे स्टेशन किंवा रेल्वे गाडीत मोठ्या आवाजात संगीत वाजवणाऱ्यांवर कठोर कारवाई होणार
- अभिनेता टायगर श्रॉफवर झालेल्या गोळीबार प्रकरणी तिघांना राजस्थानातून अटक
- इराण समर्थित हूथी बंडखोरांनी येमेनमधल्या लष्करी तळावर केलेल्या हल्ल्यात ५३ जवान ठार, २०० जवान जखमी

आणि

- आशियाई पॅरा क्रीडास्पर्धांच्या पहिल्याच दिवशी भारतीय खेळाडूंना ४ सुवर्णपदकांसह एकूण ११ पदक

**<><><><><>**

भारत आणि न्यूझीलंड यांच्यातला मुक्त व्यापार करार उद्यापासून लागू होणार आहे. या करारामुळं न्यूझीलंडमध्ये होणारी भारतीय मालाची निर्यात १०० टक्के शुल्कमुक्त असणार आहे. या करारामुळे भारतातल्या सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांसाठी, कारागीर, शेतकरी आणि औषध निर्माण क्षेत्रासाठी नव्या संधी उपलब्ध होतील असं वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल या निमित्त आयोजित कार्यक्रमात म्हणाले. न्यूझीलंडबरोबरच्या वस्तू आणि सेवा क्षेत्रातल्या द्विपक्षीय व्यापाराचं मूल्य दुप्पट करून ३५ हजार कोटी रुपयांपर्यंत नेण्याचं उद्दिष्ट ठेवलं आहे, असंही गोयल यावेळी म्हणाले. भारत आणि न्यूझीलंड यांच्यातल्या या मुक्त व्यापार करारावर यंदा एप्रिल महिन्यात नवी दिल्लीत 'भारत मंडपम' इथं स्वाक्षऱ्या करण्यात आल्या होत्या. या करारामुळे सेवा, गुंतवणूक, तसेच व्यावसायिक, विद्यार्थी आणि तरुणांच्या गतिशीलतेच्या क्षेत्रात नवीन संधी निर्माण होतील; ज्यामध्ये भारतीय व्यावसायिक आणि विद्यार्थ्यांसाठी अधिक चांगल्या संधी उपलब्ध होतील.

**<><><><><>**

मतदारसंघ पुनर्रचना विधेयकावर चर्चेसाठी केंद्र सरकारनं सातत्यानं विरोधी पक्षांशी संवाद साधण्याचा प्रयत्न केला. मात्र काँग्रेसनं वेळ दिलीच नाही असा दावा संसदीय कार्यमंत्री

किरेन रीजिजू यांनी केला आहे. राज्यसभेतले विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खर्गे यांनी या मुद्द्यावर सर्वपक्षीय बैठकीची मागणी प्रधानमंत्र्यांना पत्र लिहून केली होती. त्यावर किरेन रीजिजू यांनी खर्गे यांना पत्र लिहिलं आहे. या मुद्द्यावर सहमती निर्माण करण्यासाठी द्रमुक, समाजवादी पक्ष, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस, AIMIM आणि बीजू जनता दलाशीही चर्चा केल्याचं रीजिजू म्हणाले. यापूर्वी झालेल्या चर्चेच्या प्रयत्नांकडे दुर्लक्ष न करता महत्त्वाची विधेयकं मंजूर करण्यात अडथळे आणू नये असं आवाहन त्यांनी या पत्रात केलंय.

संसदेचं पावसाळी अधिवेशन संस्थगित होऊन २ महिन्यांपेक्षा अधिक कालावधी उलटून गेला तरी राष्ट्रपतींनी सत्र समाप्तीची घोषणा केलेली नाही. हे अभूतपूर्व असल्याचं सांगत खर्गे यांनी चिंता व्यक्त केली होती.

मात्र सत्र समाप्तीची घोषणा करण्याची कुठलीही कालमर्यादा संविधानात लिहिलेली नाही. यापूर्वीही अनेक वेळा अशाप्रकारे उशिरा या घोषणा झाल्या होत्या, हे रिरीजू यांनी पत्रात नमूद केलंय.

<><><><><>

रेल्वे गाड्यांमध्ये किंवा स्थानकात मोबाईल फोनवर लाऊड स्पीकरचा वापर करणाऱ्या प्रवाशांना दंडाची तरतूद असल्याची सूचना आज रेल्वे मंत्रालयाने जारी केली. प्रवासात किंवा रेल्वे स्थानकात संगीत, व्हिडीओ इत्यादीच्या मोठ्या आवाजामुळे इतर प्रवाशांना त्रास देणारा प्रवासी आढळला तर त्याला रेल्वे परिसरातून बाहेर काढलं जाऊ शकतं आणि एक हजार रुपयांपर्यंतचा दंड आकारला जाईल, तसंच, काही परिस्थितीत संबंधित प्रवाशाचा पास किंवा तिकीटही जप्त केलं जाऊ शकतं, असं या सूचनेत नमूद आहे. तिकीट तपासनीस आणि रेल्वे विभागातल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना हा दंड आकारण्याचे अधिकार देण्यात आले आहेत. जर एखादा प्रवासी वारंवार या नियमांचं उल्लंघन करत राहिला तर त्याला सहा महिन्यांची कैद किंवा पाच हजार रुपयांपर्यंत दंड किंवा दोन्ही शिक्षा होऊ शकतात, असंही सूचनेत म्हटलं आहे.

<><><><><>

कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी आज शेतकऱ्यांना उपयुक्त ठरणाऱ्या agriwelfare.gov.in या वेबसाइटचं अनावरण केलं. या पोर्टलच्या

माध्यमातून सरकारी योजना, आर्थिक साह्य तसंच कृषीविषयक विश्वसनीय माहिती थेट शेतकऱ्यांच्या मोबाइल फोनवर पाठवली जाणार आहे. त्यामुळं मध्यस्थांचे तसंच जटील प्रक्रियांचे अडथळे टाळले जाणार आहेत.

**<><><><>**

मेटा कंपनीच्या फेसबुक आणि इन्स्टाग्रामसारख्या समाजमाध्यम मंचांच्या आल्गोरिदममुळे वापरकर्त्यांसमोर वारंवार एकाच प्रकारचा आशय येणार नाही, याची काळजी घ्यावी, अशा सूचना सरकारनं मेटाला केल्या आहेत. कायदा-सुव्यवस्था बिघडवेल किंवा हिंसाचार भडकवेल, अशा आशयाची तपासणी करण्यासाठी चाळण्या लावाव्या, असंही इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयानं म्हटलं आहे. ताज्या घडामोडींची छायाचित्रं, व्हिडिओ, ग्राफिक्स आणि इतर आशयांचा योग्य संदर्भही दिला जावा, यासाठी पावलं उचलण्याच्या सूचनाही मंत्रालयानं मेटाला केल्या आहेत.

**<><><><>**

एका वृत्तवाहिनीनं लोकगायिका नेहा सिंग राठोड यांच्याबद्दल कथित बदनामीकारक मजकूर प्रसारित केल्याच्या वृत्ताची राष्ट्रीय महिला आयोगानं स्वतःहून दखल घेतली आहे. याबाबत आयोगानं मंत्रालयाकडून माहिती आणि प्रसारण मंत्रालयाकडून १५ दिवसांच्या आत कृती अहवाल मागवला आहे.

**<><><><>**

बॉलिवूड अभिनेता टायगर श्रॉफ याच्यावर झालेल्या गोळीबार प्रकरणी राजस्थानातून तीन जणांना अटक करण्यात आली आहे. राजस्थान आणि मुंबई पोलिसांनी संयुक्तरित्या ही कारवाई केली. हे प्रकरण अतिशय गंभीर असून पोलीस कसून तपास करत आहेत. गोळीबार करणाऱ्या आणि या कटात सहभागी असलेल्या कोणालाही सोडणार नाही, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे.

**- - होल्ड - मुख्यमंत्री - - -**

या हल्ल्यातला कुठलाही आरोपी अल्पवयीन नसून त्यापैकी दोघे हरयाणाचे तर एक बिहारचा रहिवासी असल्याची माहिती मुंबई पोलिसांनी दिली आहे. तिघांपैकी दोन जणांनी टायगर याच्या गाडीवर पाच ते सहा राऊंड गोळ्या झाडल्या होत्या. मात्र, त्यांच्याकडे हल्ल्यात वापरलेलं शस्त्र आढळलेलं नाही. या हल्ल्यासाठी त्यांनी वापरलेली मोटार सायकलही अंधेरी

परिसरातून जप्त झाल्याचं पोलिसांनी सांगितलं आहे. टायगरला कुठलीही धमकी देण्यात आली नव्हती, तसंच या हल्ल्यामागचा हेतूही स्पष्ट नसून तो आरोपींच्या चौकशीनंतर कळू शकेल, असंही पोलीस म्हणाले.

**<><><><>**

पश्चिम बंगालमधे दुर्गापूजा उत्सवातल्या अष्टमी, अंजली आणि संधिपूजा आज करण्यात आल्या. रामकृष्ण मठाच्या बेलूर आणि इतर शाखांमधे कुमारीपूजाही करण्यात आली. राज्यात ठिकठिकाणी दुर्गापूजा उत्सवासाठी उभारलेल्या मंडपांमधे भाविकांची गर्दी होत आहे. सुरक्षिततेच्या दृष्टीनं राज्यसरकारनं कडक बंदोबस्त ठेवला आहे.

**<><><><>**

इराण समर्थित हूथी बंडखोरांनी दक्षिण येमेनमधल्या लष्करी तळावर केलेल्या हल्ल्यात किमान ५३ जवान ठार तर २०० जवान जखमी झाल्याची माहिती येमेनच्या लष्करी अधिकाऱ्यांनी दिली आहे. अल आलम लष्करी तळावर बॅलिस्टिक क्षेपणास्त्रांनी के◌ेलेल्या हल्ल्यात अनेकजण जखमी झाले.

**<><><><>**

आशियाई पॅरा क्रीडास्पर्धांच्या पहिल्याच दिवशी भारतीय खेळाडूंनी जोरदार कामगिरी करत ४ सुवर्णपदकांसह ११ पदकं पटकावली.

महिलांच्या SH1 १० मीटर एअर रायफल स्टँडिंग प्रकारात **मोना अग्रवाल**नं सुवर्णवेध घेऊन भारताचं पदकांचं खातं उघडलं. याच स्पर्धेत **अवनी लेखरा** हिनं रौप्यपदक पटकावलं. पुरुषांच्या T47 लांब उडी प्रकारात **निषाद कुमार** यानं सुवर्णपदकावर नाव कोरलं. त्यानंतर पुरुषांच्या F46 प्रकारात भालाफेकपटू **रिंकू** यानं सुवर्ण, तर **अजित सिंह** यानं रौप्यपदक पटकावलं. महिलांच्या T12/T13 पंधराशे मीटर शर्यतीत **सौम्या**नं सुवर्ण, तर **राधा वेंकटेश**नं रौप्यपदकाला गवसणी घातली. तर T11 प्रकारात **वलसनैनी रवन्नी** हिनं कांस्यपदक जिंकलं. ज्युदो स्पर्धेत महिलांच्या J2 ५२ किलो वजनी गटात **कोकिळा**नं रौप्यपदक, तर पुरुषांच्या J1 ७० किलो वजनी गटात **कपिल परमार**नं कांस्यपदक मिळवलं. जलतरण स्पर्धेत पुरुषांच्या S13 फ्रीस्टाइल प्रकारात **बुदिगिना रवी कार्तिक**नं रौप्यपदकावर नाव कोरलं.

**<><><><>**

भारतीय क्रिकेट नियामक मंडळानं आज राष्ट्रीय पुरुष वरिष्ठ निवड समितीमध्ये भारताचा माजी फिरकी गोलंदाज रमेश पोवार यांची नियुक्ती केली. प्रज्ञान ओझा या समितीचे अध्यक्ष म्हणून कायम राहिले आहेत. इतर सदस्यांमधे शिव सुंदर दास, आर. पी. सिंग, अजय रात्रा यांचा समावेश आहे.

<><><><><>

फ्रान्समधे देशव्यापी निषेध आंदोलनांमधे कायदा आणि सुव्यवस्था कोलमडल्याबद्दल अध्यक्ष इमॅन्युअल मॅक्राँ यांनी चिंता व्यक्त केली आहे. मात्र गृहमंत्री लोरांह नूनयेस यांचा राजीनामा नामंजूर केला आहे.

//<><><><><>//